## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २५ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त "एक दीन, एक घंटा, एक साथ – राष्ट्र स्वच्छता अभियान" अंतर्गत स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, "राष्ट्रीय सेवा योजना (NSS) एककांतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या राज्यात आता ५ लाखांवर पोहोचली आहे. या माध्यमातून अनेक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना समाजातील समस्या समजतात व भविष्यात योग्य निर्णय घेऊन आदर्श नागरिक होण्यास मदत मिळते". त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनकार्याची माहिती देत त्यांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठी महत्त्व अधोरेखित केले. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या पंधरवड्यात आयोजित स्वच्छता अभियानाच्या पार्श्वभूमीवर आज पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त राज्यातील महाविद्यालयांमध्ये स्वच्छतेचे उपक्रम राबविण्यात येत असून सर्वांनी यात भाग घेण्याचे आवाहन करत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. तसेच वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच परिसराची स्वच्छता राखण्यावरही भर देण्याचा सल्ला दिला.

या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. व्ही. एम. रोकडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. कैलास दांडगे, मनोज इंगोले व डॉ. कविता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर विद्यापीठ परिसरात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २५ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा फुले अध्ययन केंद्रातर्फे सत्यशोधक समाज स्थापना दिनानिमित्ताने "सत्यशोधक समाजाची वर्तमान फलश्रुती' या विषयावर दि. २४ सप्टेंबर रोजी सामाजिक कार्यकर्ते विचारवंत जयसिंग वाघ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र तसेच विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु. पगारे उपस्थित होते.

यावेळी जयसिंग वाघ म्हणाले की, महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची वैचारिक पार्श्वभूमी तसेच सत्यशोधक समाजाच्या स्थापनेनंतर केलेल्या लोकोद्धारक चळवळीचे वर्तमान काळात पडलेले पडसाद याविषयी माहिती देताना आजचे बहुजन समाजाचे नेते घडविण्यामध्ये सत्यशोधक समाजाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. थोडक्यात, आजच्या काळातील ज्या आरक्षण विषयक राजकीय चळवळी सुरू आहेत त्यादेखील आजच्या काळातील सत्यशोधक समाजाची फुलश्रुती असल्याचे स्पष्ट होते अशी माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय मनोगतातून प्रा. पगारे म्हणाले की, महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून वर्णव्यवस्थेवर प्रहार करत बहुजन समाजाला दिशा देण्याचे कार्य केलेले होते. याचीच फलश्रुती म्हणून राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्यांचे हक्क सुरक्षित केलेत. एकूणच भारतातील प्रत्येक माणसाच्या हक्क अधिकारांविषयो सत्यान्वेषी भूमिकेतून तसेच विवेकशील विचारातून निर्माण झालेले संविधान हे सत्यशोधक चळवळीची फलश्रुती असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महात्मा फुले अध्ययन केंद्राच्या विभागप्रमुख डॉ. पवित्रा पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात तर आभार जितेंद्र नाईक यांनी मानले. या कार्यक्रम प्रसंगी विचारधारा प्रशाळेतील तसेच भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २५ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता